# मुंबई विद्यापीठ

परीक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई-४०००९८

क्र.परीक्षा/ प.नि./ ८३५/२०१३

दि. ९ एप्रिल २०१३

**दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये दिनांक ९ एप्रिल २०१३ रोजी आलेल्या बातमी संदर्भातील दुरूस्ती**

मंगळवार, दिनांक ९ एप्रिल २०१३ रोजी दैनिक पुढारी या वृत्तपत्रात टी. वाय. बी. ए. ची परीक्षा २ महिने लांबणीवर अशाप्रकारचे वृत्त प्रसिध्द झाले आहे या संदर्भात असा खुलासा करण्यात येत आहे की, टी. वाय. बी. ए. २०१३ च्या लेखी परीक्षा दिनांक ५ एप्रिल २०१३ पासून सुरळीत सुरू झालेल्या आहेत. टी. वाय. बी. ए. चा शेवटच्या विषयांचे लेखी पेपर्स दिनांक ३० एप्रिल २०१३ रोजी होते. दिनांक २४ एप्रिल २०१३ रोजी महावीर जयंतीची सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे केवळ २४ एप्रिल २०१३ रोजीचे टी. वाय. बी. ए. चे सर्व पेपर्स हे विद्यापीठ परीपत्रक क्र. Exam./Sc./346 of 2013 दिनांक २० मार्च, २०१३ अन्वये पुढे ढकलण्यात येवून दिनांक १ जून २०१३ रोजी ठेवण्यात आलेले आहेत. त्यामुळे टी. वाय. बी. ए. ची परीक्षा केवळ एक दिवसाने पुढे ढकलली आहे. ही परीक्षा दोन महिने पुढे ढकलण्यात आलेली नाही. त्यामुळे आपण हा खुलासा त्वरीत आपल्या वृत्तपत्रात द्यावा जेणेकरून विद्यार्थ्यांचा संभ्रम दुर होईल.

स्थानापन्न परीक्षा नियंत्रक
मुंबई विद्यापीठ